Printing

Special Issue Area April-2018

International Multilingual Research Journal

ISSN 2394-5303



# Father of Indian Constitution : Dr. Babasaheb Ambedkar

Prof. Dinesh Jaronde

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

13) Aspects of Dr. B. R. Ambedkar's Thought
Mr. Datta Uttamrao Kuntewad, Tala || 52

14) Dr. Ambedkarthought on Women Empowerment
Dr. Snehal Ramteke, Nagpur || 56

15) DR. BABASAHEB AMBEDKARAND WOMEN
Prof. Shobha Shewale, Mumbai, || 59

16) DR. AMBEDKAR'S PHILOSOPHICAL VIEWS ON EDUCATION
B. THIRUPATHI M.A; Peddapalli || 61

17) Dr. B.R. Ambedkar Views on Higher Education and its Relevance to the Present Society
Shaveta Selly, Dinanagar || 65

18) महान दार्शनिक डॉ बाबासाहेब आंबेडकर नारी सशक्तिकरण (हिन्दु कोड बिल) और ...
रश्मि. बी. वी., धारवाड़ || 68

19) डॉ. आंबेडकर — हिंन्दु कोड बिल — और महिला
प्रा.एस.के.खंडारे, मुर्तिजापूर. || 70

20) बुद्धत्व के अग्रदूत डॉ० भीमराव अम्बेडकर (एक दार्शनिक विमर्श)
डा० शशी रानी अवस्थी, कानपुर। || 72

21) स्वातंत्र्य पुर्व काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेली बहुजन ...
प्रा. डॉ. सिद्धार्थ भ. जाधव, यवतमाळ || 75

22) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आर्थिक दृष्टिकोन
प्रा. मिलींद जांभूळकरे, चंद्रपूर || 80

23) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार
प्रा.डॉ.सुनिल शिवमूर्ती रजपूत,अणदूर, प्रा.कांबळे दयानंद .सखाराम, अणदूर || 84

24) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती/जमाती आणि उच्चशिक्षण
डॉ. रविन्द्र मुन्द्रे, अकोला || 87

25)डॉ. आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार
प्रा. डॉ. अंभुरे एस. डी., सोनपेठ || 91



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

आधाराने जर आपण धोरणे आखली तर निश्चीतपणे ग्रामीण भागातील शोषितांना त्यांचा न्याय हक्क मिळेल. ब्रिटीश राजवटीत त्यांच्याच देशात राहून. संशोधन करून राजकर्त्यांचे दोष दाखवून त्यांच्याकडून त्यांनी प्रशंसा मिळविली. प्रो. सेलिग्मन यांनी त्यांना हिंदी विद्यार्थ्यांतच नव्हे तर अमेरिकन विद्यार्थ्यांतही श्रेष्ठ मानले.

**संदर्भ ग्रंथसुची:—**


१. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर—भारतीय संविध ान —डॉ. आंबेडकर साहित्य प्रचार मंडळ, नागपूर
२. दैनिक लोकमत— दि ५ डिसेंबर २०११
३. अर्थसंवाद— जुलै सप्टेंबर २००७
४. रूपयांचा प्रश्न (त्यांचा उद्गम व उपाय):— डॉ. पी.आर. आंबेडकर, लंडन पी.एस.किंग. एन्ड सन्स, लिमिटेड औस्चार्ड हाऊस २ अॅन्ड ४ग्रेट स्मीथ स्ट्रीट बेस्ट मिनीस्टर १९२३
५. आर्थिक विचारांचा इतिहास:' प्रा. डॉ. जे.एफ. पाटील, फडके प्रकाशन—जुन २००५
६. डॉ. आंबेडकर विचारमंथन, वा.ना. कुबेर, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९८
७. बाबासाहेब आंबेडकर: नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान, सुखदेव थोरात, सुगावा प्रकाशन, २००५
८. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आर्थिक दृष्टी कोन संपादक, देवेंद्र उबाळे, डॉ. आंबेडकर वाडमयीन अभ्यासमंडळ, २००६
९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, २००६
१०. डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि भारतीय जाती समाज, प्राचार्य म.ना. कांबळे, क्रांतीसिहं नाना पाटील अकादमी, २००२


**23**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार


**प्रा.डॉ.सुनिल शिवमूर्ती रजपूत**
सहाय्यक प्राध्यापक
जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
अणदूर , ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

**प्रा.कांबळे दयानंद .सखाराम**
सहाय्यक प्राध्यापक
जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
अणदूर , ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद


==============***********===============

अथांग सागर एकत्र करूनी शाई बनवली जरी मेरू हिमालय करून
लेखणी खुशाल धरू द्या करी -----
कोटी विभूती कालीदास हे लिहिण्या बसले जरी कवी रमेशा पूर्ण
भिमायण कधी न होईल पुरी ---- !

**प्रस्तावना :-**

जागतिक स्तरावरील भारतीय विद्वान , राजकीय नेता, समाजशास्त्रज्ञ, मानवशास्त्रज्ञ, भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, दलितांचे उध्दारक , शैक्षणिक क्रांतीचे प्रेरणा स्त्रोत क्रांतीकारक, प्रज्ञासूर्य, इतिहासकार, विचारवंत, प्रोफेसर, पत्रकार, संपादक, समाज सुधारक, जलतज्ञ, बौध्द धर्माचा संस्थापक, भारतातील सामाजिक , राजकीय, आर्थिक , सांस्कृतिक शैक्षणिक, कायदा , शेती, जलसिंचन इत्यादी क्षेत्रामध्ये त्यांनी केलेल्या अतुलनीय योगदानामुळे त्यांना आधुनिक भारताचा निर्माता असे म्हणतात. कोलंबिया विश्व विद्यालयाने जगातील शंभर विद्वानांमध्ये सर्वात प्रथम क्रमांकाचे स्थान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना दिलेले आहे. भारतात झालेल्या दि ग्रेटेस्ट इंडियन नावाच्या जागतिक दर्जाच्या सर्वेक्षणात टॉप १०० भारतीयांमध्ये बाबासाहेबांचे नाव पहिल्या क्रमांकावर घोषित करण्यात आले. नेपाळ मध्ये झालेल्या जागतिक बौध्द संमेलनात बौध्दभिक्षूंनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना बोधिसत्व ही उपाधी प्रदान केली. बोधिसत्व ही उपाधी हिंदू व संस्कृत ग्रंथातील महात्मा या उपाधीपेक्षा



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

सर्वात व्यापक व उच्च दर्जाची आहे. महान बौध्द भिक्षू महास्थवीर चंद्रमनी यानी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना या युगातील भगवान बुध्द असे म्हटले आहे.

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे भारतातील जवळपास ७० % लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीविषयक आपली भूमिका खोलवर जाऊन मांडली. अल्पभूधारक शेतकरी व त्याच्या उत्पादनासह इतर अडधळे शेतीत आहेत. यासाठी ग्रामीण भागातील शेतक-यांची आर्थिक स्थिती बदलायची असेल तर अत्याधुनिक पध्दतीच्या शेतीची आवश्यकता आहे. सामूहिक शेती केली तर शेतक-यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो- शेतीसाठी जमिन व पाणी हे मुख्य घटक महत्वाचे आहेत. असा सल्ला बाबासाहेबांनी दिला होता.

**उद्देश :-**

१) भारताच्या विकासात शेतीचे महत्व अभ्यासणे.

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीच्या संदर्भात मांडलेल्या विचारांचा अभ्यास करणे.

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेती उत्पादन वाढीसाठी सांगितलेल्या उपायांचा अभ्यास करणे.

४) भारताच्या कृषिविकासात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महत्व स्पष्ट करणे.

**गृहितके :-**

१) लोक संख्या वाढीमुळे भारतीय शेतीचे तुकडे तुकडे झालेले आहेत. त्यामुळे शेती नापिक स्वरूपाची बनते.

२) सामुदायिक शेती पध्दती स्वीकारल्यास शेतीची उत्पादन व कार्यक्षमता वाढते.

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्यामुळे शेतीव्यवसायात मोलाची भर पडली आहे.

**संशोधन पध्दती : -**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आलेला आहे. पुस्तके, मासिक भाषणे, गीत, वेबसाईटच्या उपयोग करून माहिती संकलित केलेली आहे.

**विषयाचे महत्व :-**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील अनेक व्यवसाय हे शेती उत्पादनावर अवलंबून आहेत. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेती उत्पादन वाढी संबंधी सांगितलेले उपाय अभ्यासणे अतिशय महत्वाचे ठरते.

'कृष' म्हणजे नांगरणे या धातूपासून कृषी हा शब्द बनला आहे. जमीन नांगरून तिच्यात बी.पेरणे आणि पेरलेल्या बियांची व त्याच्या रोपांची काळजी घाहून त्यापासून धान्य मिळविणे म्हणजे शेती किंवा कृषी होय. Agricultural हा शब्द लॅटिन भाषेतील Agricultura या शब्दापासून बनलेला असून Agerricultura हा शब्द Ager = a field आणि cultura = to culture किंवा Cultivate या दोन शब्दापासून बनलेला आहे. म्हणजेच Agriculutre means cultivation of a field असे म्हणता येईल. पिकांचे उत्पादन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावरील जमिनीच्या मशागतीचे जे शास्त्र किंवा कला असते त्यालाच कृषी किंवा शेती असे म्हणतात.

कृषीही प्राथमिक व्यवसायातील आर्थिक हालचाली पैकी एक असून कृषी व तिच्या समोवतालच्या परिस्थितीच्या अभ्यासाला Geoagricultura असे म्हणतात प्राथमिक श्रेणीच्या व्यवसायातील कृषी हा महत्वाचा व्यवसाय असून त्याचा अभ्यास स्वतंत्ररित्या कृषीभूगोल या ज्ञानशाखेत केला जातो. १

कृषी व्यवसाय हा मानवाचा प्राचीन काळापासून चालत आलेला व्यवसाय आहे. आपल्या देशाचा संपूर्णतः विकास हा शेती व्यवसायावर अवलंबून आहे. शेती हे केवळ उदरनिर्वाहाचे साधन नसून व्यापारी तत्वावर तिचा उपयोग होवू लागला आहे. म्हणूनच शेतीकडे 'उद्योग' म्हणून पाहण्यात येवू लागले आहे. पूर्वी शेती ही पारंपारीक पध्दतीने केली जात होती. त्यामुळे कृषी व्यवसायातून निघणारे उत्पन्न मर्यादित स्वरूपाचे होते. औद्योगिक क्रांतीनंतर कृषी व्यवसायात झपाट्याने विकास होऊन कृषी अवजारांमध्ये अमूलाग्र बदल घडून येऊ लागला.

किटकनाशकांचा, तणनाशकांचा वापर होऊ लागला. सेंद्रिय व रासायनिक खतांचा उपयोग कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी होऊ लागला या सर्व घटकामुळे कृषी उत्पादनात वाढ झाली. २

भारताची लोकसंख्या १२१ कोटी पेक्षा अधिक असून वाढत्या लोकसंख्येमुळे जमिनीची विभागणी होत चालली आहे. जगाच्या एकूण क्षेत्रफळापैकी २.४ % क्षेत्र जमिनीने व्यापलेले आहे. जगाच्या एकूण लोकसंख्यापैकी १६ % लोकसंख्या भारतात वास्तव्य करते. भारतातील जवळ पास ७० % लोकसंख्या ही शेती व्यवसायावर अवलंबून आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा ७० % वरून १४.७ % पर्यंत आलेला आहे. साखर कापड, खाद्यतेल यासारखे मोठे उद्योग शेतीवर अवलंबून आहेत. शेती माल निर्यातीपासून कोटयावधी रूपयाचे परकीय चलन प्राप्त होते. भारतीय लोकांची गरज ही शेती व्यवसायातून पूर्ण होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना शेतीचे महत्व माहित असल्यामुळे त्यांनी शेती विषयक विचार मांडले आहेत. भारतीय शेतीची वितरण व मालकी या



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

विषयी डॉ.बाबासाहेबांचा उत्तम अभ्यास होता. युगानुयुगे चालत आलेल्या वेडगळ प्रथा,परंपरा, जुनाट रूढी फेकून देवून लोकांना डोळस बनविण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. प्राचीन काळापासून चालत आलेली विषमतेवर आधारित समाज रचना नष्ट करून सामाजिक समानता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी आपले जीवन कार्य खर्ची घातले. त्यामुळेच त्यांचे नाव सुवर्णक्षरांनी लिहीले गेले.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी विषयक विचार : -**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विचार शेतक-यांना आणि संबध देशाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे आहेत. खेडयातील शेतक-यांचा कर्दनकाळ म्हणून मान्सूनचा लहरी पाऊस आणि कपटी सावकारांची भूमिका सर्व विदीत आहेत, याची बाबासाहेबांना जाण होती. शेतक-याच्या प्रश्नाबद्दल बाबासाहेबांना अस्था होती. कॉंग्रेस पक्षाकडून दिन-दलितांच्या शेतक-याच्या हिताची जोपासना होऊ शकत नाही. म्हणून बाबासाहेबांनी ' स्वतंत्र मजूर ' पक्षाची स्थापना केली व या वर्गाचे हित जोपासण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला. कोकणात खोत शेतक-याची मोठया प्रमाणात पिळवणूक करत होते. त्यांच्या अत्याचारापासून शेतक-याना मुक्त करण्यासाठी " डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९२९ साली कोकणात शेतक-यांचे आंदोलन सुरू केले. मुंबई असेंब्लीचे सदस्य झाल्याबरोबर खेती विरोधी विधेयक मांडून त्यांचा सातत्याने पाठ पुरावा केला " ३

सामाजिक विषमता आर्थिक विषमतेचा वृक्ष जोपासते असे डॉ. बाबासाहेबांना वाटत होते. त्यामुळे समाजातील सर्व घटकांनी एकत्र यावे असे आव्हान ते करत . महात्मा जोतीबा प्रमाणेच शेतकरी तितुका एक अशा प्रकारची भूमिका बाबासाहेब हे घेताना दिसतात. "तुमच्या सामाजिक भेदांचा फायदा घेऊन तुमचे हित शत्रू तुमची एकी होऊ देणार नाहीत तरी याबाबतीत कुणबी मराठे, महार, मांग , चांभार इत्यादी सर्वांनी शेतकरी एवढा एक आहे असे समजून आपल्या हिताच्या आढ कोणाला येऊ देऊ नका " ४ अशा प्रकारचे आवाहन केले.

भारतीय शेती आणि ग्रामीण समाज हा बाबासाहेबांच्या चिंतनाचा विषय होता. देशातील शुद्रातील शुद्रांच्या मुक्तीसाठी लढा उभारताना त्यानी आर्थिक बाजूकडे दुर्लक्ष केले नाही. दलित समाज हा ग्रामीण भागातील उपेक्षित घटक होता. जमिनीचे विषम वाटप हा गुलामगिरी जोपासणारा मुख्य घटक होता. म्हणून बाबासाहेबांनी जमिनीच्या वाटपा विषयी महत्वपूर्ण आणि क्रांतीकारी विचार मांडले. त्यांचे जमिन विषयक विचार, चीनचे भाग्यविधाते माओत्से -तुंगच्या कम्युन्सशी साधर्म्य सांगता " शेती हा राष्ट्रीय उद्योग असेल. सामुहिक शेती करावी लागेल. सरकारी सारा दिल्यानंतर उरलेले उत्पन्न शासन समप्रमाणात वितरित करेल. शेतीसाठी लागणारी उपकरणे, जनावरे, पाणी , खते , बी.बीयाणे शेतक-यांना पुरविणे हे सरकारला , बंधनकारक राहिल. जमिनीचे वाटप करताना जात व धर्माचा विचार केला जाणार नाही. जमिनीचे वितरण असे केले जाईल की त्यामुळे कुणीही खाजगी कुळ किंवा भूमिहिन शेतमजूर शिल्लक राहणार नाही. ५

डॉ.बाबासाहेबांची मुख्य कल्पना अशी होती की, स्वतंत्र भारतात ग्राम जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी शासन जे जे प्रयत्न करील त्याचा पाया सामाजिक न्याय हाच असला पाहिजे. म्हणून औद्योगिकरण आणि शेती यांचे अतूट नाते असले पाहिजे. शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग शेतक-याच्या, शेतमजूरांच्या लाभासाठी निर्माण करणे आवश्यक आहे. विकास कार्यक्रमातून मिळणा-या लाभांची न्याय हे तत्वावर समान वाटणी आणि आजवर जे वंचित म्हणून जीवन जगतात, त्याना अग्रहक्क देण्याची गरज आहे. त्यानी वारंवार प्रतिपादित केले आहेत. त्यांचा स्वावलंबनावर भर होता.

त्यावेळी सुध्दा शेतकरी वर्गाला दुष्काळास तोंड द्यावे लागत होते.

त्यावेळी सुद्धा शेतकरी वर्गाला दुष्काळास तोंड द्यावे लागत होते.

अशा प्रसंगी शेतक-यांना धीर देण्यासाठी बाबासाहेबांनी ज्या विविध योजना सुचविल्या त्यापैकी पिक विमा योजना ही महत्वाची योजना होती.

शेतजमीनीचे निरंतर होणारे तुकडीकरण ही शेती व्यवसायाच्या दृष्टीकोणातून शेती विषयक भाष्य केले. भारतीय शेती व्यवस्था आणि तिच्या समस्या जिची अवस्था या दृष्टीने विचार मांडले आहेत. 'जर्नल ऑफ इंडियन इकॉनॉमिक सोसायटी ने १९१८ मध्ये प्रकाशित केलेल्या मासिकात शेतजमिनीच्या तुकडे करणाच्या समस्येवर "स्मॉल होल्डिंग इन इंडिया अँड देअर रेमडीज " अशा आशयाचा एक शोधनिबंध प्रसिद्ध झाला. त्यात त्यांनी भारताच्या दृष्टिने शेती हा एक मोठा उद्योग आहे. प्राथमिक श्रेणीच्या व्यवसायातील शेतीला अनन्य साधारण महत्व आहे, असे मत विषद केले आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचा विकास झ ाल्याशिवाय सुधारणा होणार नाही. याची जाणिव बाबासाहेबांना होती. भारतीय अर्थव्यवथेत शेतीला जरी महत्व असले तरी उत्पादकता मात्र फार कमी आहे. ही उत्पादकता कमी असल्याचे कारण म्हणजे शेतीच्या धारण क्षेत्राचा आकार हा होय. डॉ.बाबासाहेबांच्या मते भारतातील शेत जमिनीचा आकार लहान आणि वेगवेगळया ठिकाणी विखुरलेल्या अवस्थेत असल्यामुळे शेतीच्या उत्पादकतेवर त्याचा ऋणात्मक परिमाण झाला आहे.

डॉ.बाबासाहेबांनी मांडलेले शेती विषयक विचार अतिशय महत्वपूर्ण असे आहेत त्यांच्या मते लहान धारण क्षेत्र आणि



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

विखुरलेल्या जमिनी ही खरी समस्या आहे. तेव्हा जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी केवळ जमिनीचे एकत्रीकरण महत्वाचे नसून त्यांच्या आकार वाढवून किफायतशीर करणे हे सुध्दा महत्वाचे आहे. जमिनीचे धारणे क्षेत्र किफायतशीर आहे का बिनकिफायतशीर आहे ही गोष्ट त्या जमिनीच्या क्षेत्रावर अवलंबून नसून त्याठिकाणी इतर उत्पादक घटकांचे प्रमाण कितपत योग्य आहे. यावर अवलंबून असते. या दृष्टीने विचार केल्यास मोठया धारण क्षेत्राप्रमाणे छोटे धारण क्षेत्रही किफायतशीर ठरू शकतात. जमिनीची उत्पादकता वाढविण्याचा खरा उपाय धारण क्षेत्राच्या आकारात वाढ करणे नसून जमिनीवर भांडवल व इतर उत्पादनाच्या घटकात वाढ करणे होय. ६

पाणी ही निसर्गाची देणगी आहे. शेतीला पाणी पुरवठा होणे अतिशय गरजेचे आहे. त्यासाठी बाबासाहेबांनी लहान मोठेजलविद्युत प्रकल्पाची व धरणांची निर्मिती केली . त्याचा उपयोग अनेक नदीचे क्षेत्र ओलीता खाली येण्यास मदत झाली .

उदा.दामोदर खोरे, हिराकुड, टिकारपार निरज, तुंगभद्रा धरण इत्यादी धरणाचा उपयोग जलसिंचनासाठी होऊ लागला.

**निष्कर्ष : -**

१) डॉ.बाबासाहेबांनी खोत पध्दत नष्ट करून शेतक-यांचा पाठींबा घेऊन हे विधेयक कायदेअंतर्गत मांडळात मांडून शेतक-यांच्या प्रशाला वाचा फोडली.

२) डॉ-बाबासाहेबाच्या विचारामुळे व कार्यामुळे भारतीय शेतकरी स्वतंत्र व स्वावलंबी होऊ शकला.

३) मोठमोठया धरणामुळे जलसिंचनाखाली बरेच क्षेत्र आले.त्यामुळे शेतीचा विकास झाला.

**संभदर्भसूची : -**


१) डॉ.सुरेश फुले , कृषी भूगोल.विद्याभारती प्रकाशन पृ.४५ व ४६

२) प्रा.दादासाहेब भटिवाल, कृषी भूगोल, प्रशांत प्रकाशन पृ. ७

३) जोशी शरद, शेतक-यांची कर्जमुक्ती सत्यात येत आहे. कृषी अर्थ मंथन , शेतक-यावरील कर्जे विशेषांक(कालिदास आपटे) परभणी मार्च २००६ पृ.९०

४) लोखंडेभाऊ, लोकराज्य, आंबेडकरी क्रांतीचे सिंहावलोकन धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण मोहत्सव विशेषांक , आक्टो २००६ पृ.१५

५) उपरोक्त पृ.१६

६) तेगमपुरे मारूती, डॉ.बाबासाहेबांचे आर्थिक विचार दै. वृतरत्न सम्राट , दि.२४/०४/२००७, पृ.४

७) http://www.lokmat.com


24

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती/जमाती आणि उच्चशिक्षण


**डॉ. रविन्द्र मुन्द्रे**

सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,

श्रीमती राधादेवी गोमनका महिला महाविद्यालय, अकोला


===============**********===============


Abstract :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शोषीत समाजाच्या प्रगतीचा मार्ग म्हणजे उच्चशिक्षण होय. आपल्या संपूर्ण जीवनाकाळात त्यांनी यासाठी मोठा संघर्ष केलेला दिसतो. भारतातच नव्हे तर विदेशात सुद्धा त्यांच्यासाठी शिक्षणाची सोय करून दिली. अनुसूचित जाती/जमातीच्या शिक्षणावर भर देऊन त्यांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धनाची विशेष काळजी घेतलेली दिसते. भारतीय राज्यघटनेमध्ये उच्चशिक्षण घेणे हा सर्वांचा अधिकार आहे असे नमूद करून उच्चशिक्षणाने देशाच्या विकासाची गती वाढते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते.


Keywords : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अनुसूचित जाती/जमाती, उच्चशिक्षण

Introduction :

बहिष्कृत हितकारिणी सभा, मुंबई विधिमंडळात केलेले भाषण, शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनचा जाहिरनामा, १५ मार्च १९४७ ला घटना समितीला सादर केलेला मसुदा अशा अनेक घटनांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षणाची गरज शोषित समाजाला किती आहे, हे पटवून दिले होते. एवढेच नव्हे तर स्वतः ऱ्पीपल्स एज्युकेशन सोसायटीफची स्थापना करून उच्च शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य केले आहे. त्यांनी उच्चशिक्षणासंबंधी केलेले कार्य, दिलेली भाषणे, मांडलेल्या सूचना, सुचविलेल्या सुधारणांची आजही उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात आवश्यकता आहे.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.